


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९० वा | सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# भाजपने मराठ्यांवर राजकीय अन्याय केला

## मराठा क्रांती मोर्चाचे 'मूक आंदोलन' | मुख्यमंत्री फडणवीस व पालकमंत्री गोरे यांना अल्टिमेटम

## भाजपविरोधात राज्यभरात यात्रा काढणार | महापौर विनायक कोंड्याल यांनी राजीनामा द्यावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजावर झालेल्या राजकीय अन्यायाच्या विरोधात आज सोलापूर शहरात मूक आंदोलन करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच भाजपच्या स्थानिक नेतृत्वावर मराठा समाजाला राजकीय प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. जोपर्यंत मराठा समाजाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा ठाम इशाराही यावेळी देण्यात आला.

मराठा आंदोलक व मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक राम जाधव यांनी सांगितले की, 'मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष आणि पालकमंत्र्यांनी मराठा समाजावर झालेल्या अन्यायाची दखल घेऊन तात्काळ राजकीय न्याय देण्याची भूमिका घ्यावी. अन्यथा सोलापुरातून सुरू झालेल्या आंदोलनाची धग संपूर्ण महाराष्ट्रात पसरल्याशिवाय राहणार नाही.'

यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा संपर्कप्रमुख शत्रुघ्न माने, डोणगावचे उपसरपंच रमेश पाटील, युवराज पाटील, बंटी सोनके, शिरीष सुरवसे, नंदू घाडगे, तुळशीदास शिंदे, राहुल जाधव, किरण शिरसागर, अक्षय गुंड, मारुती सुरवसे, ओमकार धावणे, सागर गायकवाड, राज सरडे, प्रतीक जाधव, रोहन आवताडे, आबा शिंदे, माऊली चटके, वीरेश कलशेट्टी, अक्षय पांडे, अक्षय माळवडकर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलकांनी विविध मुद्द्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने मतपेटीतून स्पष्ट उत्तर दिले.

विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाने भाजपला साथ दिली म्हणूनच सत्ता मिळाली.






मात्र सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे ५५ पेक्षा जास्त जागांचे स्वप्न असताना, मराठा समाजावर झालेल्या अन्यायामुळे पक्षाला केवळ ३८ जागांवर समाधान मानावे लागले, असा आरोप करण्यात आला.

१९९३ नंतरच्या ३२ वर्षांच्या काळात सर्वच राजकीय पक्षांनी विविध समाजांना महापौरपद देऊन न्याय दिला. यंदा तीन दशकांनंतर महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असताना मराठा समाजाचा महापौर न होणे, ही जाणीवपूर्वक केलेली राजकीय उपेक्षा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

आंदोलकांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोर थेट प्रश्न उपस्थित केले :

विद्यमान महापौर कोंड्याल यांचा राजीनामा घेऊन मराठा समाजाचा महापौर नेमणार का?

जिल्हा परिषद अध्यक्षपद ओबीसीसाठी असताना 'कुणबी मराठा' समाजाचा अध्यक्ष करून समाजाला न्याय देणार का?

मंगळवेढा तालुक्यातील दोन सर्वसाधारण जागांवर ओबीसी उमेदवार का दिले?

मराठा समाजाला प्रमुख पदांपासून वंचित ठेवण्याचा हेतू आहे का?

राम जाधव यांनी सांगितले की, गेल्या २० वर्षांत मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी सर्वच राजकीय पक्षांविरोधात ५० हून अधिक आंदोलने केली आहेत. मराठा आरक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर आणि महामंडळाला ७०० कोटींचा निधी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पहिला सत्कार मराठा समाजानेच केला होता. मात्र आता झालेल्या राजकीय अन्यायाविरोधात संघर्ष अटळ असून, जोपर्यंत मराठा समाजाला योग्य न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या आंदोलनामुळे सोलापूरच्या राजकारणात खळबळ उडाली असून, आगामी काळात मराठा समाजाचा हा लढा अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नदीकाठच्या शेतकऱ्यांना दिलासा!

## उजनीचे पाणी आळगे-खानापूरमार्गे हिळ्ळी बंधाऱ्याकडे

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोचवण्याच्या निर्णयानंतर उजनी धरणातून सोडलेले पाणी भीमा नदीपात्रातून मजल दरमजल करत शनिवारी (ता. २८) सकाळी आळगे बंधाऱ्यात दाखल झाले.

दिवसभर वाढलेल्या प्रवाहामुळे बंधारा भरल्यानंतर हे पाणी खानापूरच्या दिशेने पुढे सरकत दुपारी बारा वाजता खानापूर येथे पोचले.



खानापूर बंधाऱ्यातून पुढे वेगाने प्रवाह सुरू असून, हे पाणी उद्या (रविवारी) पहाटेनंतर हिळ्ळी बंधाऱ्यात दाखल होण्याची शक्यता आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर आळगे, खानापूर आणि हिळ्ळी या तिन्ही बंधाऱ्यांत पाणी पोचल्याने नदीकाठच्या शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

या पाण्यामुळे मार्च व एप्रिल या दोन महिन्यांत नदीकाठच्या ऊस व चारा पिकांना तसेच पाणीपुरवठा योजनांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, पाणी येण्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी नदीपात्रातील विद्युत मोटारी, वायर व इतर साहित्य सुरक्षित स्थळी हलवताना दिसत आहेत.

उजनीतून सोडलेल्या पाण्याचा प्रवाह सध्या चांगला आहे. आळगे व खानापूर बंधारे भरून पाणी हिळ्ळीपर्यंत पोचेल. तेथील साठा पुढील दोन महिने पुरेल. शेतकऱ्यांनी पाणीपट्टी वेळेवर भरून पाण्याचा योग्य वापर करावा.

**- कृष्णा वडेर,**
शाखा अभियंता, अक्कलकोट

# मराठा आंत्रप्रन्योर असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय Business Expo 2026 चे उद्घाटन

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** मराठा आंत्रप्रन्योर असोसिएशनच्या वतीने आयोजित International Business Expo 2026 चे उद्घाटन आज राज्याचे सहकार मंत्री मा.श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत केले. तब्बल ५०० हून अधिक उद्योजकांचे स्टॉल्स असलेले हे भव्य प्रदर्शन उद्योग, व्यापार आणि सेवाक्षेत्रातील नव्या संधींचे दालन ठरत आहे. विविध क्षेत्रांतील यशोगाथा येथे प्रेरणादायी ठरत असून नवउद्योजकांना दिशा देणाऱ्या आहेत. आजपासून सुरू झालेला हा एक्स्पो १ मार्च २०२६ पर्यंत सिंचननगर येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर सर्वांसाठी खुला असणार आहे.

मराठा समाजातील उद्योजकांच्या सर्वांगीण विकासासाठी एम.ई.ए.ने सक्षम आणि परिणामकारक व्यासपीठ उभे केले आहे. आज या संघटनेशी १२०० हून अधिक उद्योजक जोडले गेले असून व्यापार, उद्योग, उत्पादन आणि सेवा अशा सर्व क्षेत्रांत मराठा बांधवांनी एकत्र येत एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळेच हा एक्स्पो केवळ व्यावसायिक मेळावा नसून मराठा समाजाच्या प्रगतीचा, स्वाभिमानाचा आणि सामूहिक शक्तीचा उत्सव ठरत आहे.

आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना व्यापारमार्ग सुरक्षित केले, बंदरांचा विकास केला आणि सशक्त अर्थकारणाची पायाभरणी केली. कारण अर्थव्यवस्था मजबूत असेल तर स्वराज्यही मजबूत राहते, ही त्यांची दूरदृष्टी होती. त्याच विचारांचा वारसा जपत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी MEA सारखे व्यासपीठ निर्माण करण्याचा संकल्प आज साकार होताना दिसत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'डिजिटल इंडिया' यांसारख्या उपक्रमांद्वारे नवउद्योजकतेला अभूतपूर्व प्रोत्साहन दिले आहे. दहा वर्षांपूर्वी स्टार्टअपची संख्या पाचशेच्या आसपास होती; आज ती दोन लाखांवर पोहोचली आहे.



यातील ४५ टक्क्यांहून अधिक स्टार्टअपमध्ये किमान एक महिला संचालक आहे, ही महिलाशक्तीच्या सहभागाची प्रेरणादायी बाब आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील उद्योगांना नवचैतन्य मिळाले असून थेट परकीय गुंतवणुकीत राज्य देशात सातत्याने अग्रस्थानी आहे. विशेषतः पुणे आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असल्याने रोजगारनिर्मितीला चालना मिळत आहे आणि पुण्याचे जागतिक औद्योगिक नकाशावरील स्थान अधिक दृढ होत आहे. मराठा उद्योजकांना बळ देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे सक्षमीकरण करण्यात आले असून लाखो तरुणांना स्वयंरोजगार आणि उद्योगाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच 'सारथी' संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास आणि स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम व्यवस्था उभी करण्यात आली आहे.

आज या एक्स्पोच्या माध्यमातून समाजाच्या 'नेटवर्क'चा वापर समाजाच्या 'नेटवर्थ'साठी करण्याचा संकल्प दृढ करण्यात आला. सामूहिक शक्ती, परस्पर सहकार्य आणि उद्योजकतेच्या बळावर मराठा समाज नव्या आर्थिक उंचीवर झेपावेल, याचा ठाम विश्वास या भव्य आयोजनातून व्यक्त होत आहे.

यावेळी महापौर मंजुषाताई नागपुरे, खासदार श्रीरंगअप्पा बारणे, राजेश पांडे, असोसिएशनचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, उपाध्यक्ष नितीन भोसले, प्रमोद साठे, विजय गवारे, श्रीनाथ भिमाले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मराठा उद्योजक उपस्थित होते.

# ओबीसी हक्क परिषदच्या सोलापूर शहराध्यक्षपदी प्रकाश कटारे यांची नियुक्ती

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ओबीसी हक्क परिषदच्या सोलापूर शहराध्यक्षपदी प्रकाश निलकंठ कटारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राष्ट्रीय मुख्य सल्लागार तथा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धाकटे बंधू प्रल्हादभाई दामोधर मोदी तसेच संस्थापक अध्यक्ष प्रदीपभाऊ बाबुराव फाले आणि महाराष्ट्र प्रदेश संघटक काशिनाथ गणपत पोतदार यांच्या आदेशानुसार जाहीर करण्यात आली आहे.

प्रकाश कटारे हे सोलापूर शहरातील गोकुळ नगर, जुळे सोलापूर येथील रहिवासी असून सामाजिक व संघटनात्मक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सोलापूर शहरात ओबीसी हक्क परिषदेला अधिक बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



नियुक्तीपत्रात नमूद केल्याप्रमाणे, कटारे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहरात ओबीसी समाजाच्या हक्क व प्रश्नांवर संघटित लढा उभारला जाईल. तसेच विचारशील व संघर्षशील कार्यकर्त्यांना संघटनेत सहभागी करून संस्थेची तत्त्वे, धोरणे आणि विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाणार आहे.

महाराष्ट्र प्रदेश संघटक काशिनाथ गणपत पोतदार यांनीही या नियुक्तीबाबत शुभेच्छा देत, संघटन विस्तार आणि जनजागृतीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन केले आहे.

सोलापूर शहरातील सामाजिक व राजकीय वतुर्ळात या नियुक्तीची चर्चा सुरू असून, आगामी काळात ओबीसी हक्क परिषदेकडून विविध कार्यक्रम व उपक्रम राबवले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




# घरकुलाच्या बांधकामासाठी लाभार्थ्यांना मिळाला १८७१ ब्रास मोफत वाळू - कुलदीप जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी अनुदान मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय जिल्हयातील ६५३ लाभार्थ्यांना आतापर्यंत १८७१ ब्रास वाळू मोफत देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

राज्य शासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास वाळू देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार घरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने वाळू उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक गावातील लाभार्थ्यांचा एक गट




तयार करण्यात येत असून या गटास एकाच दिवशी ऑनलाईन प्रणालीने पास वितरीत करुन त्यांना वाळू देण्यात येत आहे. यासाठी ग्रामसेवक, तलाठी, पोलिस पाटील यांचे योगदान घेण्यात येत आहे.

लाभार्थ्यांना सुलभपणे वाळू उपलब्ध होईल असे नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मध्यंतरी अतिवृष्टीमुळे यात अडथळा निर्माण झाला. अजूनही काही वाळू घाटात पाणी असल्याने वाळू उपसा करणे अडचणीचे ठरत आहे. अशा परिस्थितीतही - शासनाकडून ज्या ठिकाणी वाळू उपलब्ध होईल, त्याठिकाणाहून प्राधान्याने घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यात येत आहे.

लाभार्थ्यांना वाळू देण्यासाठी मंगळवार व शुक्रवार असे दोन वार निश्चित करण्यात आले आहेत. लाभार्थ्यांच्या नोंदीनुसार महसूल खात्याकडून लाभार्थ्यांची वाळूची नोंदणी महाॲपवर करण्यात येत आहे. महसूल खात्याकडूनही यासाठी विशेष योगदान लाभत आहे.

अतिवृष्टीमुळे घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्यात आतापर्यंत अडथळा होता, मात्र आता अनेक ठिकाणी वाळू उपसा करणे शक्य असल्याने लाभार्थ्यांच्या मागणीनुसार त्यांना सुलभपणे वाळू उपलब्ध करुन देण्यात येत असल्याची माहिती सीईओ जंगम यांनी दिली.

## सायं दैनिक सोलापूर कटूसत्य वृत्तपत्राच्या मालकी आणि इतर तपशील यासंबंधीचे निवेदन

(वृत्तपत्र नोंदणी कायदा १९५६ च्या मध्यवर्ती नियमावलीनुसार फॉर्म-४ प्रमाणे)

| | |
|---|---|
| **१) वृत्तपत्राच्या प्रसिद्धीचे ठिकाण** | :- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३ |
| **२) प्रसिद्धीचा कालावधी** | :- सायं. दैनिक |
| **३) मुद्रकाचे नाव** | :- पांडुरंग हरिदास सुरवसे |
| **नागरिकत्व** | :- भारतीय |
| **पत्ता** | :- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३ |
| **४) प्रकाशकाचे नाव** | :- पांडुरंग हरिदास सुरवसे |
| **नागरिकत्व** | :- भारतीय |
| **पत्ता** | :- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३ |
| **५) संपादकाचे नाव** | :- पांडुरंग हरिदास सुरवसे |
| **नागरिकत्व** | :- भारतीय |
| **पत्ता** | :- टी-१०, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३ |
| **६) वृत्तपत्राचा कार्यालय पत्ता** | :- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३ |
| **७) वृत्तपत्राच्या मालकी हक्कामध्ये एका टक्क्याहून अधिक मालकी असलेल्या भागीदारी किंवा भागीदारांची नावे** | :- पांडुरंग हरिदास सुरवसे |
| **व पत्ते** | :- मुक्ता रेसिडेन्सी, ब्लॉक नं. १३, ज्ञानेश्वर नगर जवळ, सोलापूर-३ |

मी **पांडुरंग हरिदास सुरवसे** असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

पांडुरंग हरिदास सुरवसे
**प्रकाशक**

दिनांक: -०२/०३/२०२६

## संपादकीय

# केरळ: आकडे बोलतात, आरोप नव्हे

अलीकडच्या काळात केरळ या राज्याबद्दल सामाजिक माध्यमांवर आणि काही राजकीय व्यासपीठांवरून सातत्याने नकारात्मक प्रचार केला जातो. प्रश्न असा आहे, हा राग नेमका कशाचा? विचारधारेचा? की विकासाच्या मोजमापात मागे पडण्याची भीती?

भारतातील विविध राज्यांची तुलना करताना भावनिक घोषणांपेक्षा वस्तुनिष्ठ आकडे महत्त्वाचे ठरतात. आणि हेच आकडे सांगतात की शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि मानवी विकासाच्या अनेक निकषांवर केरळ सातत्याने आघाडीवर राहिले आहे.

केरळने दशकानुदशके शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. देशातील सर्वाधिक साक्षरता दर, स्त्रीशिक्षणातील आघाडी, आणि मुलींच्या शिक्षण सोडण्याचे अत्यल्प प्रमाण ही केवळ आकडेवारी नाही; ती सामाजिक परिवर्तनाची साक्ष आहे. शिक्षणाचा प्रसार केवळ शहरी भागापुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागातही प्रभावीपणे झाला. यामुळे सामाजिक गतिशीलता वाढली आणि गरिबी कमी करण्यास हातभार लागला.

बालमृत्यू दर आणि मातामृत्यू दर देशातील सर्वात कमी असणाऱ्या राज्यांमध्ये केरळ अग्रस्थानी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे मजबूत जाळे, सार्वजनिक आरोग्य धोरणांवर सातत्याने गुंतवणूक आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर भर या घटकांनी सरासरी आयुर्मान देशात सर्वाधिक पातळीवर नेले आहे.

दरडोई उत्पन्न, परदेशातून येणारी रेमिटन्स, उच्च मजुरी दर हे सर्व निदेर्शांक आर्थिक सक्षमीकरण दर्शवतात. विशेष म्हणजे, उच्च सामाजिक विकास आणि आर्थिक प्रगती यांचा समतोल राखण्यात केरळने वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनेक दशकांपासून परदेशात कार्यरत असलेल्या केरळी कामगारांमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात परकीय चलन येते, ज्याचा परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर सकारात्मक झाला आहे.

लिंग गुणोत्तर, स्त्रियांचे सक्षमीकरण, आणि ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण या बाबतीत केरळने प्रगत धोरणे राबवली. वैवाहिक हिंसाचाराचे प्रमाण तुलनेने कमी असणे आणि महिलांची सामाजिक–राजकीय सहभागिता अधिक असणे हे समाजातील प्रगत दृष्टिकोनाचे लक्षण आहे.

NITI Aayog व इतर संस्थांच्या अहवालांनुसार मानवी विकास निदेर्शांकात केरळ सतत अग्रस्थानी राहिले आहे. सुशासन, पारदर्शकता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची सक्षमता या घटकांनी राज्याची प्रतिमा अधिक बळकट केली आहे.

जेव्हा एखादे राज्य शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक विकासाच्या बाबतीत आदर्श मानले जाते, तेव्हा राजकीय मतभेदांमुळे त्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. परंतु विकासाची तुलना ह्यप्रचारह्ण आणि ह्यअपप्रचारह्ण यावर नव्हे, तर आकडेवारी आणि परिणामांवर व्हायला हवी.

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात उत्तर प्रदेश, बिहार, गुजरात किंवा केरळ—प्रत्येक राज्याची ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी वेगळी आहे. तुलना करायचीच असेल, तर ती 'कोण मागे' या दृष्टीने नव्हे; तर 'कोणाकडून काय शिकता येईल' या सकारात्मक दृष्टीकोनातून व्हायला हवी.

राज्यांविषयी असलेली मतभिन्नता लोकशाहीत स्वाभाविक आहे. मात्र एखाद्या राज्याच्या प्रगतीकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय द्वेषातून अपप्रचार करणे हे देशहिताचे नाही. केरळने काही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे, हे मान्य केल्याने इतर राज्यांचे योगदान कमी होत नाही.

देशाची उभारणी 'कोणाला खाली खेचायचे' यावर होत नाही; ती ह्यकोणाकडून काय शिकायचे' यावर होते. जर विकासाची खरी स्पर्धा हवी असेल, तर शिक्षण, आरोग्य, लिंगसमता आणि मानवी सन्मान यांसारख्या मुद्द्यांवर सर्व राज्यांनी एकमेकांकडून प्रेरणा घ्यावी.

खोटी माहिती आणि भावनिक घोषणांपेक्षा सत्य आणि आकडे यांवर आधारित चर्चा हीच प्रगल्भ लोकशाहीची ओळख आहे.

# पर्यावरण पूरक होळी साजरी करावी



देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो.यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मिलन दिसून येते. महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळीवेगळे महत्त्व आहे. होळी म्हणजे मराठी वषार्चा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वषार्नुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा महिना आहे. नवीन वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासुन होते म्हणजेच "गुडी पाडवा". त्यामुळे जुने वर्ष होळी व धुलीवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वषार्चे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.बदलत्या काळानुसार होळी व धुलीवंदन साजरे करतांना पर्यावरण व निसगार्चे संतुलन जोपासने अत्यंत गरजेचे आहे.त्याच अनुषंगाने कोणत्याही धमार्चे सण असो त्यांनी सुध्दा निसगार्ला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणी टंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.त्यामुळे होळी हा सण साजरा करतांना पर्यावरणाशी निगडित असावा जेणेकरून निसगार्ला इजा पोहोचणार नाही.कारण होळी या सणाला लाकुड,पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडित आहेत.होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पहाता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे.देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे.त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा."उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा !हा !कार" यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे.वाढती लोकसंख्या यामुळे मानवाने भुभावर पुर्णतः अतिक्रमण केल्याचे दिसून येते. देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो. होळीच्या दीवशी गुलाल, रंग,वारीस इत्यादीसह केमिकल युक्त रंगाचा वापर होतांना आपण पहात असतो.यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते यापासून सावध राहण्याची गरज आहे.रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय कीती होतो.होळी या सणाला दरवर्षी "लाखो लिटर" पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते.आजही देशासह महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो.आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.त्यामुळे आज पाण्याचा "एक एक थेंब" वाचवीण्याकरीता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे. होळीचा सण हा पाच दिवस म्हणजेच पंचमी पर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पहाता होळी दहणाकरीता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरीता गोअरीचा (काउडंग)चा वापर जास्त करावा यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल.देशात आणि जगात पाण्याची समस्या पहाता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सनाचा आनंद घ्यावा. आज पाण्याच्या भरोशावरच मनुष्य,पशुपक्षी,अन्न-धान्य, संपूर्ण जीवसृष्टी,जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते.पाणी हे "सोन"समजा आणि होळीला फक्त "गुलाल" किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा.ज्या प्रमाणे मानवाला "अन्न,वस्त्र, निवारा" या गोष्टीची गरज आहे त्याचप्रमाणे आज संपूर्ण जिवसृष्टीला व पृथ्वीला "पाण्याची" नितांत गरज आहे. जंगल तोडीमुळे निसगार्चे संतुलन "विस्कळीत" झाले आहे.त्यामुळे आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शिरकाव करतांना दिसते.कारण मानवाने स्वतःच्या स्वाथार्साठी जंगल संपदेवर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसुन आपण जंगलाकडे आगेकूच( अतिक्रमण) करीत आहोत. त्यामुळे होळी करीता कमीत कमी लाकडांचा वापर केला पाहिजे. त्याचप्रमाणे होळीच्या निमित्ताने अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता असते ती ताबडतोब थांबवली पाहिजे.आता वाढत्या कारखान्यांमुळे आणि परमाणु परीक्षण,शस्त्रस्पर्धा आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे होळीला पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे.भारतासह संपूर्ण जगभर २२ मार्चला "जागतीक जल दीन"पाळला जातो याची कृती होळीच्या सणा पासुन करावी व पाणी वाचवावे. कारण पाणी हे निसगार्चे "अनमोल रत्न"आहे. त्याला वाचवीण्याचा प्रयत्न सर्वांनीच सर्व स्तरातून केला पाहिजे. इतर देशांप्रमाणे भारतसुध्दा पाण्याच्या बाबतीत "रेडलाईट झोनमध्ये" आहे. त्यामुळे भारतसुध्दा पाणी टंचाईच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.त्यामुळे होळीचे औचित्य साधून प्रत्येकांनी आपल्या परीसरात एक-एक झाड लावुन निसगार्ला पुनरूज्जीवीत केले पाहिजे व सर्वांनीच पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. यातच खऱ्याअर्थाने "होळी व धुलीवंदन" दीसुन येईल.त्यामुळे "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारून पुढचे पाऊल टाकायला पाहिजे.करोना महामारीने मानवजातीला बरेच काही शिकवीले.त्याचे अनुकरण करून प्रत्येकांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. होळी उत्सवात उन्माद नको! हुल्लडबाजी नको परंतु आनंद भरपूर घ्यावा. यामुळे सर्वांचेच जीवन सुरक्षित रहाण्यास मोठी मदत मिळेल. कारण आपण सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित, निसर्ग सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित, संपूर्ण जीव सृष्टी सुरक्षित तर जग सुरक्षित.यासाठी होळीच्या महत्वपूर्ण सणाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व पर्यावरण सुधारण्यास मोठी मदत होईल आणि होळी या सणाचे महत्त्व संपूर्ण जगात निसर्ग वाचविण्याच्या दृष्टीकोनातून चांगला संदेश जगभर पसरेल. जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज' भालेवाडी येथे हुरडा पार्टी व शिवार भोजन उत्साहात

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पांतर्गत विशेष घटक आधारित पर्यटनाच्या माध्यमातून विकसित होत असलेल्या भालेवाडी (ता. मंगळवेढा) येथील 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज' या संकल्पने अंतर्गत हुरडा पार्टी व पारंपरिक शिवार भोजन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सदर उपक्रम जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून प्रकल्पास तांत्रिक सहाय्य प्रायमूव्ह, पुणे यांचे लाभत आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकारी व ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने ज्वारीच्या कणसांचा हुरडा भाजून कणीस मळण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. शिवारफेरीत विविध पिकांची पाहणी केली व स्थानिक शेती पद्धतींची माहिती घेतली. तसेच झाडांवरील ताज्या फळांचा आस्वाद घेत ग्रामीण जीवनशैलीचा जवळून परिचय करून देण्यात आला. ग्रामीण वातावरणात आयोजित शिवार भोजनामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे सातत्य राखण्याची अपेक्षा व्यक्त केली.



'मिल्क अँड मिलेट व्हिलेज' या संकल्पनेद्वारे दुग्धव्यवसाय व भरड धान्य (मिलेट्स) आधारित शेतीला प्रोत्साहन देत पर्यटनाशी संलग्न पूरक व्यवसायांची संधी निर्माण होत आहे. या माध्यमातून स्थानिक महिला बचत गट, शेतकरी व युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे.

या कार्यक्रमास उप कार्यकारी अधिकारी (जि.प.) सूर्यकांत भुजबळ, जिल्हा परिषद अधिकारी (वी.पी.) वैभव अहाळे, तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, तालुका उपकृषी अधिकारी प्रशांत काटे उपस्थित होते. तसेच भालेवाडीचे सरपंच श्रीकांत दवले, गाईड वनमित्र नानासाहेब रोंगे, ग्राम महसूल अधिकारी दत्तात्रय गायकवाड, एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पाचे कृषी पर्यटन तज्ञ रमेश खळदकर, स्थापत्य अभियंता विनायक जवळकोटे, संवाद तज्ञ नितीन सुकळीकर, क्षेत्र समन्वयक भूषण महाजन, पर्यटन समिती सदस्य व इतर ग्रामस्थ मिळून एकूण 62 जणांची उपस्थिती होती.

'भालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेला 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज' अंतर्गत हुरडा पार्टी व शिवार भोजन हा उपक्रम ग्रामीण पर्यटन विकासाच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक आणि दिशादर्शक ठरत आहे. स्थानिक शेती, दुग्धव्यवसाय आणि भरड धान्य आधारित उत्पादनांना पर्यटनाशी जोडून गावाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा प्रभावी उपक्रम आहे.

ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्रशासनाच्या समन्वयातून ही संकल्पना आगामी काळात जिल्ह्यात आदर्श मॉडेल म्हणून विकसित होईल, असा विश्वास आहे.ह्ण असे उप कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सूर्यकांत भुजबळ यांनी कळविले आहे.

# अरण येथे पांडुरंगाच्या मूळ पादुका नेण्याच्या मागणीवर सभागृहात चर्चा

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** संत परंपरेने समृद्ध असलेल्या महाराष्ट्रात संत शिरोमणी संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला यंदा सुमारे ७३० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अरण येथे होणाऱ्या सोहळ्यासाठी पांडुरंगाच्या मूळ पादुका नेण्याच्या मागणीवर लक्षवेधीद्वारे चर्चा झाली. या विषयावर सभागृहात विविध सदस्यांनी मते मांडल्यानंतर पीठासीन अधिकारी म्हणून विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्व संबंधितांनी एकत्रित बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घ्यावा, अशा सूचना केल्या.

लक्षवेधी क्र. २ द्वारे सदस्य योगेश टिळेकर यांनी अरण येथे होणाऱ्या संत सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर मार्फत पांडुरंगाच्या मूळ पादुका आणण्याची मागणी मांडली. वारकरी संप्रदायाच्या भावना आणि संत परंपरेतील अध्यात्मिक संदर्भ लक्षात घेऊन समितीने आवश्यक तरतुदींमध्ये दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित न्यासच्या कामकाजाबाबत तक्रारींची चौकशी करून आवश्यक असल्यास प्रशासक नेमण्याची मागणीही करण्यात आली.

यावर उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले की अरण येथे मूळ पादुका नेण्याची परंपरा अस्तित्वात नसून, सुमारे दीडशे वर्षांपासून स्थानिक परंपरेनुसार दुसऱ्या पादुकांची पालखी जाते. २०१४ पासून पंढरपूर ते आळंदी दरम्यान मूळ पादुका नेण्याची प्रथा सुरू झाली आहे; मात्र अरण संदर्भात अंतिम निर्णय संबंधित न्यासच्या बैठकीत घेतला जाईल. तक्रारी प्राप्त झाल्यास नियमानुसार चौकशी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

चर्चेत सहभागी होताना सदस्य अमोल मिटकरी यांनी वारकरी संप्रदायाच्या भावनांचा आदर करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली. तसेच मंदिर समिती व न्यासच्या मुदतवाढ आणि कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केले.

यावर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संत परंपरा, वारकरी समाजाच्या भावना आणि कायदेशीर बाबी यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे नमूद केले. न्यासातील अनेक सदस्यांची कालमयार्दा संपल्याने सद्यस्थितीत न्यासची नाममात्र असल्याने त्यांनाही निर्णय घेतांना मयार्दा येत आहेत .न्यासाची सद्यस्थितीनव संभाव्य मतभेद लक्षात घेता सर्व संबंधित घटक , परंपरा अभ्यासक , वारकरी प्रतिनिधी आणि कायदेविषयक तज्ज्ञ यांची बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. समाधी सोहळ्यापूर्वी निर्णय व्हावा, असेही त्यांनी सभागृहातून सुचित केले.

या चर्चेमुळे संत सावता महाराजांच्या समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अरण येथील धार्मिक परंपरा, वारकरी संप्रदायाच्या भावना आणि मंदिर समितीच्या अधिकारक्षेत्राचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# माळीनगर गट नंबर दोन येथे म.फुले उद्यानाचे उदघाटन



**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** दि. सासवड माळी एज्युकेशन सोसायटी संचलित,प्राथ. शाळा क्र. ३ माळीनगर गट नंबर दोन येथे महात्मा फुले उद्यानाचे उदघाटन व माजी विद्यार्थी सन्मान सोहळा आज गुरुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी दि. सा.मा. एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे आणि संचालक पृथ्वीराज भोंगळे यांच्या हस्ते संपन्न झाला. प्राथमिक शाळेच्या मैदानामध्ये नव्याने तयार करण्यात आलेल्या उद्यानातील विद्यार्थ्यांसाठीची सर्व खेळणी दि.सासवड माळी शुगर फॅक्टरीचे व एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांच्या सहकायार्तून मिळाली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सेक्रेटरी अजय गिरमे हे होते.यावेळी शैक्षणिक क्षेत्रामध्ये विशेष प्राविण्य मिळवलेले शाळेचे माजी विद्यार्थी प्रा.डॉ.गणेश गोरख धायगुडे यांनी वाणिज्य शाखेतून पीएचडी पदवी मिळवल्याबद्दल आणि कु.अश्विनी कैलास निकम यांची कृषी अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल या दोघांचाही सन्मान अजय गिरमे, ज्योतीताई लांडगे, पृथ्वीराज भोंगळे आणि डॉ.संजय घोंगणे यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास अविनाश पांढरे,माजी सैनिक महादेव देवकर,श्री.निकम, जहांगीर तांबोळी, मीनानाथ मांडवे, विठ्ठल धायगुडे, नेहरू काळे, संतोष करडे,शिक्षक गोविंदा काळे,वंदना बंडगर,आदी पालक,माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी दोन्ही सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी जितेंद्र लांडगे,समीर लोणकर, आणि जयसिंह कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळा आणि शिक्षकांचे कौतुक केले.तसेच राजेंद्र भोसले, प्रा. डॉ.गणेश धायगुडे,आणि कु.अश्विनी निकम यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी खाऊ भेट दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका ललिता नागटिळक यांनी केले. तसेच सूत्रसंचालन स्मिता म्हेत्रे आणि उज्वला देवकाते यांनी केले. उपस्थित पाहुण्यांचा सन्मान शिक्षक प्रवीण खरात व गौरी शिंदे यांनी केला. शेवटी या कार्यक्रमाचे आभार वैजिनाथ भोसले यांनी मानले.

# भारतात पेट्रोल 200 लिटर पार जाणार? महागाईचा भडका उडणार?

## मोदींनी बोलावली तातडीची बैठक

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरोधात संयुक्त मोहीम हाती घेऊन, त्या देशावर जोरदार हल्ले चढवला. इराणमधील धार्मिक, राजकीय आणि लष्करी तळाला लक्ष्य केलं. यात इराणच्या इस्लामिक रिपब्लिकचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह रुहोल्लाह खोमेनी यांचा मृत्यू झाला.

इराणने देखील प्रत्युत्तर देत इस्त्रायलसह, कतार, कुवेत, बहारिन, संयुक्त अरब अमिराती इथल्या अमेरिकी लष्करी तळांवर प्रतिहल्ले करण्यात आली.

युद्धाग्नीची तीव्रता वाढल्यास त्याची सर्वाधिक झळ भारताला बसू शकते, आणि भारतातील पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढून महागाईचा भडका उडण्याची भीती निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज रात्री दिल्लीत पोहोचत आहे. तिथं ते लगेचच कॅबिनेट कमिटी ऑन सिक्योरिटीची बैठक घेणार आहे. ही बैठक रात्री उशिरा होण्याची शक्यता आहे.

इराण-इस्त्रायलनो-अमेरिकेमधील युद्ध भारतापासून 2 हजार 139 किलोमीटर दूर सुरू आहे. यातच अफगाणिस्तान अन पाकिस्तानमध्ये युद्धाचा भडका उडाला आहे. एकप्रकारे पश्चिम आशियात युद्धाग्नीची धग लवकरच भारतापर्यंत, घरापर्यंत पोहोचणार आहे. या महायुद्धामुळे भारतात पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढून महागाईचा भडका उडण्याची भीती निर्माण झाली आहे. तसा अर्थतज्ज्ञांनी इशारा दिला आहे.

इराण हा जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक देशांपैकी एक आहे. इराणकडे तब्बल 158 बिलियन बॅरल कच्च्या तेलाचा साठा आहे. जरी अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराण पूर्ण क्षमतेने



निर्यात करू शकत नसला, तरी चीन आणि भारतासारख्या देशांसाठी इराण हा महत्त्वाचा स्रोत आहे.

चीन दररोज 18 लाख बॅरल तेल इराणकडून घेतो. भारताचा विचार केला, तर आपल्या एकूण गरजेपैकी 40 टक्के कच्चे तेल आणि 50 टक्के एलएनजी खाडी इराण, सौदी अरब, युएई या देशांमधून येते. पण आता या युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे.

भारतासाठी सर्वात चिंतेची बाब म्हणजे 'होर्मुज जलडमरूमध्य'. हा एक अत्यंत अरुंद सागरी मार्ग आहे, ज्याला जागतिक तेलाची 'लाईफलाईन' म्हटले जाते. जगातील 20 टक्के कच्च्या तेलाची वाहतूक याच मार्गातून होते. भारताच्या एकूण तेल आयातीपैकी 50 टक्के तेल याच मार्गाने येते. सौदी, इराक, कुवेत आणि कतारचे तेल देखील याच मार्गाने भारतात पोहोचते.

युद्धामुळे इराणने हा मार्ग बंद केला, तर भारतासह चीन आणि जपानला तेलाच्या महासंकटाचा सामना करावा लागेल. मालवाहतूक आणि विम्याचा खर्च वाढल्याने कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होईल. युद्धाची तीव्रता वाढल्यास, आणि तेल पुरवठा खंडित झाला, तर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती 95 ते 110 डॉलर प्रति बॅरल पर्यंत जातील. सध्या ब्रेंट क्रूड 73 डॉलरच्या आसपास असले तरी ते सात महिन्यांच्या उच्चांकावर आहे.

भारतातील तेल कंपन्या कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा भार जास्त काळ सोसू शकत नाहीत. परिणामी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ अटळ आहे. जागतिक परिस्थिती हाताबाहेर गेल्यास पेट्रोलचे दर ऐतिहासिक उच्चांक गाठून सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी कात्री लागेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु याबाबत अशी कोणतीही माहिती भारत सरकारकडून देण्यात आलेली नाही.

## वात्रटिका

### होळी

चंगळ आहे कोणाची
त्यातच कोणी रंगला...
कायमच नशिबी फाल्गुन
त्याच्या नशिबी शिंमगा आला...
अवगुण दुर्गुण जाळावे आणि
वाईटाची करावी होळी...
आज केला संकल्प तसा तर
सुखाने भरेल तुमची झोळी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

